कंत्राटदारांच्या नोंदणीचे
प्रस्तावासोबतच्या कागदपत्रांची
छाननी/पडताळणी/खातरजमा
करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : सीएटी ०९/०१/प्र.क्र.४०९/इमारती-२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ११/१०/२००१.

कंत्राटदारांच्या नोंदणीचे प्रस्ताव सादर करीत असताना काही प्रकरणी खोट्या कागदपत्रांच्या आधारे काही कंत्राटदारांनी नोंदणी प्रमाणपत्र मिळविले आहे असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. अशा प्रकरणांना आळा घालण्यासाठी कंत्राटदारांच्या नोंदणीचे प्रस्ताव सादर करताना पुढीलप्रमाणे कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी :-

१) कंत्राटदाराने कार्यकारी अभियंत्याकडे नोंदणीसाठी प्रस्ताव दाखल केल्यानंतर प्रस्तावासोबत सादर केलेल्या प्रमाणपत्राच्या सत्यतेबाबतची खातरजमा कार्यकारी अभियंता यांनी ज्या कार्यालयाने/प्राधिकरणाने अशी प्रमाणपत्रे दिली आहेत, त्या कार्यालयांकडे संपर्क साधून करावी.

२) कंत्राटदारांनी सादर केलेल्या प्रस्तावातील मूळ प्रमाणपत्रांच्या सत्यतेबाबत खातरजमा केलेनंतर नोंदणी प्रस्तावासोबत शासनास सादर करावयाच्या विविध प्रमाणपत्रांच्या सत्य प्रती या ज्या विभागाकडून प्रस्ताव दाखल करण्यात येतो, त्या विभागाच्या कार्यकारी अभियंता/उप कार्यकारी अभियंता/विभागीय लेखा अधिकारी/विभागीय लेखापाल यांनी त्यांचे स्वाक्षरीनेच साक्षांकित कराव्यात. अन्यथा प्रस्ताव विचारात घेतला जाणार नाही.

३) कंत्राटदाराने खाजगी कामे केल्याबाबतची प्रमाणपत्रे प्रस्तावासोबत सादर केली असल्यास, सदर कामे त्या कंत्राटदारानेच केली आहेत याची शहानिशा संबंधित कार्यकारी अभियंता यांनी करावी. तसेच केलेल्या कामाच्या किंमतीबाबत खातरजमा करावी.

४) काही प्रकरणी साखर कारखाना/सूत गिरणी यांच्या कामाचे दाखले सादर करण्यात येतात. अशा प्रकरणी साखर आयुक्त/संचालक हातमाग,यंत्रमाग व वस्त्रोद्योग, नागपूर यांचेकडून सदरील कामाचे दाखले प्रति स्वाक्षरीत असणे आवश्यक आहे.

५) शासनास सादर करावयाच्या प्रस्तावासोबत "या प्रस्तावात असलेल्या सर्व प्रमाणपत्रांच्या सत्यतेबाबत संबंधित कार्यालयांशी संपर्क साधून खातरजमा करणेत आली आहे" असे प्रमाणपत्र कार्यकारी अभियंता यांनी देणे आवश्यक आहे.

कार्यकारी अभियंता यांनी कंत्राटदार नोंदणीबाबतचे प्रस्तावाची सखोल छाननी करुन वर नमूद केल्याप्रमाणे प्रस्तावातील विविध प्रमाणपत्रांच्या सत्यतेबाबतची खातरजमा करुनच आवश्यक अटींची/निकषांची पूर्तता होत आहे, असेच प्रस्ताव सक्षम अधिकाऱ्याकडे मंजूरीसाठी सादर करावेत.

कार्यकारी अभियंत्याकडून प्राप्त झालेल्या कंत्राटदार नोंदणी प्रस्तावातील प्रमाणपत्रे खोटी असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित कार्यकारी अभियंत्यावर कारवाई करण्यात येईल.

(शि. वि. तामखडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

सर्व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,
सर्व अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,
सर्व कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
कार्यासन अधिकारी, इमारती-३, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय.